I J R S S I S, Issue (IX), Vol. (I), May 2023: 172-175
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 517X
Original Article

Reg. No. : MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# संजय गांधी निराधार योजना: एक चिकीत्सक अध्ययन

**राजेश पी.कांबळे[१] व मनिषा दर्शन बारसागडे[२]**
[१]डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय,ब्रम्हपुरी
[२]आंनद निकेतन महाविद्यालय,वरोरा
*Corresponding Author :- kamblerp17@gmail.com, manipatil3009@gmail.com

Communicated : 21.01.2023 Revision : 28.02.2023 Accepted : 27.03.2023 Published : 30.05.2023

**सारांश :**

स्वातंत्र्यापासुन आजपर्यंत भारतीय लोकसंख्या ही सतत वाढत चालली आहे. त्याला लोकांतील शिक्षण व अंधश्रध्दा कारणीभुत ठरते. या वाढत्या लोकसंख्येला मनुष्य हाच कारणीभुत आहे. त्यामुळे मनुष्याला पायउतार व्हावे लागले आहे. 'मुल हे देवाच देण' अशा अंधसमजुतीमुळे ग्रामिण शेतकरी हा दारिद्रय व कमजोर व लाचार बनला आहे. त्यामुळे ग्रामीणात दारिद्रय, बेरोजगारी, उपासमार, भुमिहीन राहण्यास घर नाही म्हणजे त्यानां आवश्यक असणाऱ्या गरजापासुन वंचित राहावे लागत आहे. आतापर्यत केलेल्या अभ्यासावरून असे लक्षात येते की,ज्या योजना ग्रामीण भागातील लार्भाथ्याला देण्यात आल्या त्या योजनापैकी संजय गांधी निराधार योजना वरदान ठरली आहे. अनुसूचित जाती,अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय व दारिद्रय रेषेखाली लोकांचे जिवनमानाचा स्थर उंचावला आहे. ग्रामीण विकासावर अनुकूल परिणाम घडून आला आहे.ग्रामीण विकासासाठी अजुनही संजय गांधी निराधार योजना चालू ठेवणे आवश्यक आहे. शासकीय आधाराशिवाय ग्रामीण विकासाचे भवितव्य आशादायी नाही.

**मुख्यशब्द :** संजय गांधी निराधार योजना, स्थानिक स्वराज्य संस्था, ग्रामीण विकास, दारिद्रय रेषा.

## प्रस्तावना :

भारतात प्रत्येक खेडयात पंचायतराज पध्दतीचा विकास हे महात्मा गांधीजीचे स्वप्न होते. खेडयाचा विकासासाठी १९५२ साली "सामुदायिक विकास योजना" सुरू करण्यात आला. हा कार्यक्रम ५५ प्रकल्पात १६५ विकास गटात सुरू झाला. परंतु हा कार्यक्रम अयशस्वी ठरल्यामुळे जास्तीत जास्त लोकांना विकास कार्यात सहभागी करून घेण्यासाठी राष्ट्रीय विस्तार सेवा योजना २ ऑक्टोबर १९५३ पासुन सुरू करण्यात आली. वरील दोन्ही योजनेमध्ये आलेल्या अपयशामुळे नियोजन मडंळाच्या प्रकल्प समितीने पंचायतराज व्यवस्थेचे स्वरूप व कल्पना निश्चित करण्यासाठी केद्रं शासनाने १९५७ मध्ये गुजरातचे माजी मुख्यमंत्री श्री. बलवतंराव मेहता यांच्या अध्यक्षेखाली एक समिती नियुक्त केली होती. ठाकुर फुलकर,डी.पी. सिंग,बी.जी.राव हे या समितीचे सदस्य होते. मेहता समितीने आपला अहवाल १९५८ मध्ये सादर केला. या समितीने लोकशाहीच्या विंकद्रीकरणावर भर दिला व स्थानिक स्वराज्य संस्थाच्या या त्रिस्तरीय रचनेची शिफारस केली. ग्रमीण "पंचायतराज" असे संबोधले होते.

### स्थानिक स्वराज्य संस्था –

आजचा गावकरी हा आपल्या अधिकाराच्या बाबतीत जागरूक झाला आहे. लोकसहभागातुन ग्रामीण विकास शक्य आहे. तसेच लोकशाही विकेंद्रिकरण व लोकसहाय्य या द्वारेच ग्रामीण विकास होवू शकते. खेडयांच्या विकासासाठी स्थानिक स्वराज्य संस्था या मजबुत व्हायला हव्या. तसेच या संस्थाना जास्तीचे अधिकार मिळाले पाहिजे. भारतात पंचायत व्यवस्थेमध्ये स्थानिक स्वराज्य संस्था या मजबुत बनत चालल्या आहेत. महाराष्ट्रात पंचायतराज व्यवस्था १९६२ पासुन लागु झाली आणि त्यातुनच त्रिस्तरीय व्यवस्था निर्माण झाली. जिल्हा परिषद जिल्हा पातळीवर, पंचायत समिती तालुका पातळीवर व ग्रामपंचायत गाव पातळीवर शक्तीमान झालेली दिसुन येते.

I J R S S I S, Issue (IX), Vol. (I), May 2023: 172-175
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 517X
Original Article

**ग्रामीण विकास –**

खेडयांच्या विकासासाठी स्थानिक स्वराज्य संस्था या मजबुत व्हायला हव्या. कारण वाढत्या लोकसख्येमुळे अनेक कुटूंब निर्माण होवुन शेतकरी हा शेतमजुर बनला. भुमिहीन बेघर निर्माण झाले. संजय गांधी निराधार योजनेतंर्गत भुमिहीन, शेतमजुर,अंध अपंग,विधवा कुटूंबाना आर्थिक अनुदान देण्याचा उपक्रम सुरू आहे. त्याच प्रमाणे दारिद्रय रेषेखाली असलेल्या ग्रामीण जनतेचा विकास घडवून आणावा यासाठी स्थानिक जिल्हयातील संजय गांधी निराधार योजनेचा पहिलाच अभ्यास आहे. त्यामुळे शासन, जनता, विविध संस्था व अभ्यासक यांच्या दृष्टीने विषयाचे अत्यंत महत्व आहे. भारतीय राज्यघटनेच्या ४० व्या कलमाचा आधार घेवून गावाच्या विकास करण्याच्या दृष्टीने जबाबदारी घटनने राज्यसरकारवर टाकलेलली आहे. विकासाच्या संदर्भात ज्या विविध योजना राबविल्या जातात त्या योजनाचे ग्रामीण विकासात काय योगदान आहे.हे पहाण्याकरीता शासनचर्चा ज्या विविध योजना आहेत. त्यापैकी संजय गांधी निराधार योजनेचे अध्ययन अभिप्रेत आहे. ग्रामीण विकासात संजय गांधी निराधार योजना कितपत यशस्वी झालेली आहे. हे पाहण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

**विषयाची निवड –**

वाढत्या लोकसंख्येमुळे अनेक कुटूंब निर्माण होवुन शेतकरी हा शेतमजुर बनला. भुमिहीन बेघर निर्माण झाले. संजय गांधी निराधार योजनेतंर्गत निराधार महीलांना,अंपगाना,अनाथ मुलांना अनुदान देण्याचा उपक्रम सुरू आहे. हि राज्यात १९८० पासून राबविण्यात येत आहे. ग्रामीण जनतेचा विकास घडवून आणावा यासाठी स्थानिक जिल्हयातील संजय गांधी निराधार योजनेचा पहिलाच अभ्यास आहे. त्यामुळे शासन, जनता, विविध संस्था व अभ्यासक यांच्या दृष्टीने विषयाचे अत्यंत महत्व आहे. भारतीय राज्यघटनेच्या ४० व्या कलमाचा आधार घेवून गावाच्या विकास करण्याच्या दृष्टीने जबाबदारी घटनने राज्यसरकारवर टाकलेलली आहे. विकासाच्या संदर्भात ज्या विविध योजना राबविल्या जातात त्या योजनाचे ग्रामीण विकासात काय योगदान आहे. हे पहाण्याकरीता शासनचर्चा ज्या विविध योजना आहेत. त्यापैकी संजय गांधी निराधार योजनेचे अध्ययन अभिप्रेत आहे. ग्रामीण विकासात संजय गांधी निराधार योजना कितपत यशस्वी झालेली आहे. या योजनेस भ्रष्टाचार तर नाही झाला? ही योजना ज्या लोकांना देण्यात आली त्यांचा लाभ त्यानाच मिळाला की नाही? ही हे पाहण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोध प्रबंधात करण्यात येत आहे. कारण प्रस्तुत विषयाला अर्थशास्त्रात अनन्य साधारण महत्व प्राप्त झाले आहे.

**संजय गांधी निराधार योजना –**

संजय गांधी निराधार योजनेतंर्गत निराधार महीलांना,अंपगाना,शारीरीक,मानसिक,आजाराने रोगग्रस्त व्यक्ती,विधवा,अत्याचारीत महीला,वेश्या व्यवसायातुन मुक्त केलेल्या महीला,घटस्फोटीत महीला, अनाथ मुलांना अनुदान देण्याचा उपक्रम सुरू आहे. हि राज्यात १९८० पासून राबविण्यात येत आहे. ग्रामीण जनतेचा विकास घडवून आणावा यासाठी स्थानिक जिल्हयातील संजय गांधी निराधार सुरू करण्यात आली आहे. या योजनेचा लाभ घेण्याकरीता वय ६५ पाहीजे आहे.लाभार्थ्यास दरमहा रूपये ६०० देण्यात येतात.एका कुटुबांत एका पेक्षा अधिक लाभार्थी असल्यास कुंटूबाला रूपये ९०० प्रतिमाह अनुदान देण्यात येते. या योजनेमुळे ग्मीण विकासात महत्वाचे पाऊल पडताना दिसते आहे. शासनाच्या सहकार्याशिवाय ग्रामीण विकासात चैतन्य निर्माण होवु शकत नाही हे सत्य आहे.

**चंद्रपूर जिल्हयातील संजय गांधी निराधार योजनेची सद्य:स्थिती:—**

संजय गांधी निराधार अनुदान योजनेअंतर्गत लाभार्थ्यास ६००रूपये प्रतिमहीना शासनाकडून देण्यात येतो. एका कुटुंबात एकापेक्षा जास्त लाभार्थी असल्यास कुटुंबाला ९०० रूपये प्रतिमहीना देण्यात येतो. संजय गांधी निराधार अनुदान ही योजना १०० टक्के अनुदानावर असल्याने कर्ज परत फेडीची आवश्यकता नसते. चंद्रपूर जिल्हयामध्ये, सर्व तहसीलमध्ये संजय गांधी निराधार योजना ही सुरू आहे. संजय गांधी निराधार अंतर्गत २०११ च्या जनगणनेनुसार चंद्रपूर जिल्हयामध्ये ७०९२ लाभार्थी आहेत.

**पात्र लाभार्थी वर्ग :**

१. संजय गांधी निराधार योजेनेचा लाभ मिळविण्यासाठी निराधार महिला,निराधार विधवा महिला असायला पाहीजेत.

२. घटस्फोट झालेल्या परंतू पोटगी न मिळणा.या महिला असाव्यात.

३. अंध,मूकबधिर,कर्णबधीर,मतीमंद हा लाभार्थी असायला हवा.

४. लाभार्थी हा कोणत्याही जातीतील असावा.जातीचे बंधन नाही.

५. संजय गांधी निराधार योजेनेचा लाभ मिळविण्यासाठी कुटूंबीयाची पुर्ण तयारी असली पाहिजे.

६. कुटूंबामध्ये अनाथ मुले असल्यास त्यांचे वय १८ वर्षापेक्षा कमी असावे.

७. आत्महत्या केलेल्या शेतक.याच्या कुंटूबांचे वार्षिक उत्पन्न २१००० रूपयापेक्षा कमी असावे.

८. क्षयरोग,पक्षाघात,कर्करोग,एडस,कुष्ठरोग या सारख्या आजारामुळे स्वतच्या चरितार्थ चालवू न शकणारे स्त्री व पुरूष या योजनेचे लाभ घेवु शकतात.

९. लाभार्थ्याचे वय ६५ वर्षापेक्षा कमी असावे.

१०. संजय गांधी निराधार योजेनेचा लाभ शेतमजुर महिला पण घेवु शकतात.

इत्यादी पात्रतेचे लाभार्थी या योजनेचा लाभ घेवू शकतो.

**निवड पध्दती :**

या योजनेस आवश्यक असणाऱ्या पात्र लाभार्थ्याची निवड खालीलप्रमाणे होते.

१. ग्रामपंचायत मधील यादीत नोंद असलेल्या लाभार्थ्याची दखल ग्रामसेवकाद्वारे केली जाते.

२. ग्रामपंचायतीला या वर्षात करण्यात येणाचा प्रकरणाच्या संख्येनुसार ग्रामसेवक आवश्यक असणाऱ्या कुटूंबाला योजनेची माहिती पुरविणे.

३. त्या माहितीच्या आधारे कुटूंबाचे प्रकरण सरपंचाच्या सहीनंतर ग्रामसभेत ठेवले जाते. ग्रामसभेची मान्यता घेतली जाते.

४. नंतर ते प्रकरण ग्रामसेवक पंचायत समितीकडे पाठविले जाते.

५. पंचायत समितीद्वारा मंजुर झालेल्या प्रकरणाचा लाभार्थ्याशी नावे ग्रामपंचायतकडे पाठविले जाते.

६. मंजुर झालेल्या लाभार्थीला ग्रामसेवकाद्वारे कळविल्या जाते.

७. अनुदान लाभार्थ्याच्या बॅकेच्या खात्यावर दर महीन्याला जमा करण्यात येते.

**संशोधनाची गृहीतके**

संशोधनासाठी खालील गृहीतेकाचा आधार घेण्यात आलेला आहे.

१. संजय गांधी निराधार योजनामुळे ग्रामीण विकासावर अनुकूल परिणाम घडून आला आहे.

२. ग्रामीण विकाससाठी अजुनही संजय गांधी निराधार योजना चालू ठेवणे आवश्यक आहे.

३. शासकीय आधाराशिवाय ग्रामीण विकासाचे भवितव्य आशादायी नाही

४. संजय गांधी निराधार योजनामुळे आर्थिक उत्पन्नात वाढ झाली आहे.

५. संजय गांधी निराधार योजनामुळे लोकांचे जिवनमानाचा स्थर उंचावला आहे.

**विषयाची व्याप्ती –**

संजय गांधी निराधार योजेना ही संपूर्ण भारतात सुरू आहे. तेव्हा एवढया मोठया क्षेत्राचे अध्ययन करणे शक्य नसल्याने चंद्रपूर जिल्हयाचा विचार प्रामुख्याने केला आहे. चंद्रपूर जिल्हयातील पंचायत समिती अंतर्गत नमुना पध्दतीद्वारे काही गावाची निवड अध्ययन क्षेत्र म्हणुन निवडयात आले आहे.

**निष्कर्ष –**

संजय गांधी निराधार योजना ही ग्रामीण भागासाठी वरदान ठरली आहे. संजय गांधी निराधार योजनेमुळे निराधार महीलांना,अंपगाना,अनाथ मुलांचा जिवनमानाचा स्थर उंचावला आहे. ग्रामीण विकासावर अनुकूल परिणाम घडून आला आहे.ग्रामीण विकासासाठी अजुनही संजय गांधी निराधार योजनाा चालू ठेवणे आवश्यक आहे. शासकीय आधाराशिवाय ग्रामीण विकासाचे भवितव्य आशादायी नाही. संजय गांधी निराधार योजना दारिद्रय रेषेखालील व्यक्तीचे आर्थिक उत्पन्नात वाढ झाली नाही हे सत्य आहे. शासनाने कोणतीही योजना देताना त्या योजनेचा पुरेपुर फायदा लाभार्थ्याला झाला की नाही हे तपासण्यासाठी दर दोन वर्षोनी एक चौकशी समिती नेमावी आणि त्या योजनेत काही बदल करता आला तर तो करावा.

**संदर्भ :**

सुन्द्ररम के.पी.एम.एवं दत्त रूद्र, भारतीय अर्थव्यवस्था,एस. चंद्र प्रकाशन नई दिल्ली २००३

आगलावे, डॉ. प्रदिप, संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे.,विद्या प्रकाशन, नागपूर (२०००)

बी.एन.युगधन, पंचायती राज व्यवस्थेतील अतंरग ग्रामहिन,पिपंळापूरे ॲण्ड पब्लीकेशन्स

सुधाकर शास्त्री , भारतीय अर्थव्यवस्था , एस.चंद्र प्रकाशन, नई दिल्ली २००३

श्री. मनोज आवळे, पंचायत राज – कार्य कायदा, योजना, पिपंळापूरे ॲण्ड कंपनी पध्दती पब्लीशर्स, नागपूर

**६. प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा जिल्हा परिषद चंद्रपूर**